# <u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.</u>

**( अंदाजपत्रकीय विशेष सभा )**

दि. २२.०२.२०१६ रोजी सकाळी ११.00 वाजता नांवामनपा स्थायी समितीची अंदाजपत्रकीय विशेष सभा सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थाई समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सौ. अनुजा अमितसिंह तेहरा, सभापती**

<u>सर्वश्री</u>

| | |
|---|---|
| मोरे संजय गंगाधर | अन्नेवार गंगासागर संदिप |
| इंदूबाई शिवाजीराव घोगरे | विनयकुमार गुर्रम |
| संगिता पृथ्वीराज राओत्रे | ज्योती महेंद्र खेडकर |
| शर्मा पुष्पाताई राजेश | कदम गंगाबाई नारायण |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | फारुख हुसेन कासीम साब |
| जकीया बेगम स. मुखतार | |

**सभापती** सर्व प्रथम उपस्थित सर्व स.सदस्य, श्री सुशिल खोडवेकर आयुक्त, श्री रत्नाकर वाघमारे उपआयुक्त, श्री आर.एस.कोलगणे मुख्य लेखा परिक्षक, श्री प्र.मा.येवले, प्र.उपआयुक्त, श्री विजयकुमार मुंडे, प्र. उपआयुक्त, श्री डॉ. मो. आसिफ प्र. मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री म. सादीक मुख्य लेखाधिकारी, श्री विसपुते, लेखाधिकारी जेएनएनयुआरएम व सर्व क्षेत्रिय अधिकारी व विभाग प्रमूख यांचे स्वागत करुन आजच्या अंदाजपत्रकीय विशेष सभेच्या कामकाजास सुरवात करण्यात येते.

**विषय क्र. 1**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 **चे** कलम ९५ च्या अधिन राहून मा.आयुक्त,नांवामनपा यांनी सादर केलेले नांवामनपाकेचे सालसन २०१५-२०१६ चे सुधारीत व सालसन २०१६-२०१७ चे मूळ अंदाजपत्रकास मान्यता देवून ते मान्यतेसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस शिफारस करणे बाबत.

**आयुक्त** सालसन २०१५-२०१६ चे सुधारीत व सालसन २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रकास संदर्भात मी माझे प्रास्ताविक वाचून दाखवित आहे.

( आयुक्तांनी आपले लेखी प्रास्ताविक सभागृहात वाचुन दाखविले. ज्याची प्रत सर्व स.सदस्य स्थायी समिती यांना देण्यात आली होती. पुढील वर्षी कोणकोणत्या योजना अमलात आणावयाच्या आहेत त्याची ठळक तरतूदीची माहिती दिली.)

**विनय गुर्रम** मा.आयुक्त साहेबांनी स्थायी समिती समोर सालसन सालसन २०१५-२०१६ चे सुधारीत व सालसन २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रक अत्यंत चांगल्या प्रकारे सादर केलेले आहे.त्याबध्दल त्यांना धन्यवाद. आयुक्तांनी जे अर्थसंकल्प सादर केला तो महानगरपलिकेच्या आर्थिक हिताचा सादर केला आहे सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पावर विचार करण्यासाठी वेळ देणे आवश्यक आहे. करीता या अर्थसंकल्पावर अभ्यास करण्यासाठी (१५) दिवसाचा वेळ देण्यात यावा तो पर्यत आजची विशेष सभा तहकुब करण्यात यावी असा माझा प्रस्ताव आहे.

**उमेशसिंह चव्हाण** श्री विनय गुर्रम यानी मांडलेल्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभापती** आयुक्तांनी आजच सालसन २०१५-२०१६ चे सुधारीत व सालसन २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रकास चे मुळ अर्थसंकल्प सादर केलेले असून स्थायी समिती सदस्याना त्यावर अभ्यास करण्यासाठी १५ दिवसात वेळ देण्यात येतो तो पर्यत आजची स्थायी समितीची अर्थसंकल्पी विशेष सभा तहकुब करण्यात येते. पुढील सभेची तारीख लेखी कळविण्यात येईल

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.

**दिनांक २२.०२.२०१६ ची अंदाजपत्राकिय तहकुब सभा**

दि. ०५.०३.२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता नांवामनपा स्थायी समितीची अंदाजपत्रकीय विशेष सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थाई समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सौ. अनुजा अमितसिंह तेहरा, सभापती**

**सर्वश्री**

| | |
|---|---|
| मोरे संजय गंगाधर | अन्नेवार गंगासागर संदिप |
| इंदूबाई शिवाजीराव घोगरे | प्रविण बालासाहेब बियाणी |
| विनयकुमार गुर्रम | संगिता पृथ्वीराज राओत्रे |
| ज्योती महेंद्र खेडकर | सलिमा बेगम नुरुल्लाखान |
| शर्मा पुष्पाताई राजेश | इशरत फातेमा अ.शमीम |
| कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम | कदम गंगाबाई नारायण |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | फारुख हुसेन कासीम साब |
| जकीया बेगम स. मुखतार | |

**सभापती** सर्व प्रथम उपस्थित सर्व स.सदस्य, श्री सुशिल खोडवेकर आयुक्त, श्री रत्नाकर वाघमारे उपआयुक्त, श्री आर.एस.कोलगणे मुख्य लेखा परिक्षक, श्री प्र.मा.येवले, प्र.उपआयुक्त, श्री विजयकुमार मुंडे, प्र.उपआयुक्त, श्री डॉ. मो. आसिफ प्र. मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री म. सादीक मुख्य लेखाधिकारी, श्री विसपुते, लेखाधिकारी जेएनएनयुआरएम व सर्व क्षेत्रिय अधिकारी व विभाग प्रमूख यांचे स्वागत करुन आजच्या अंदाजपत्रकीय विशेष सभेच्या कामकाजास सुरवात करण्यात येते.

**विषय क्र. 1**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 **चे** कलम ९५ च्या अधिन राहून मा.आयुक्त,नांवामनपा यांनी सादर केलेले नांवामनपाकेचे सालसन २०१५-२०१६ चे सुधारीत व सालसन २०१६-२०१७ चे मूळ अंदाजपत्रकास मान्यता देवून ते मान्यतेसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस शिफारस करणे बाबत.

**उमेश चव्हाण** आयुक्त साहेबांनी स्थायी समितीस नांदेड वाघाळा शहरमहानगरपालिकेचे सालसन २०१५-२०१६ चे सुधारीत व सालसन २०१६-२०१७ चे मूळ अंदाजपत्रक अतिषय छान व सुदंर पध्दतीने सादर केलेले आहे, त्याबदल त्यांचे अभिनंदन करतो. महाराष्ट्र शासनाने स्थानिक संस्था कर बंद केल्यामूळे महानगरपालिकेचे उत्पन्नात मोठयाप्रमाणात घट झाली .त्यामूळे आयुक्त साहेबांनी यावर्षी महानगरपालिकेचे रु. ३९७.३८ कोटीचे अंदाजपत्रक प्रस्तावित केलेले आहे.आम्ही मागील दोन तीन स्थायी समितीच्या सभेत महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून शहरातील सर्व ठोक किरकोळ व्यापा-यापासून ते चहा व पान स्टॉल व्यवसायीकांचा सर्व्हे करुन या सर्व व्यवसायीकांना आवश्यक ते शुल्क निश्चित करुन कम्पलसरी व्यवसाय परवाना देण्यात यावा.ज्याचा व्यवसाय परवान्याची मुदत सपंलेली आहे त्यांनाही शुल्क धेवून त्यांचे व्यवसाय परवान्याचे नुतनीकरण करण्यात यावे अशी मागणी करीत आहोत. नांदेड शहरात जवळपास ५० हजार व्यवसायी आहे या सर्वाना कम्पलसरी व्यवसाय परवाना दिलातर त्यापासुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस १० ते १५ कोटीची उत्पन्न होवू शकते. या वाढीव उत्पन्नामूळे नांदेड शहरात स.सदस्यांनी स्वेच्छा निधीतून सुचविल्याप्रमाणे त्याचे प्रभागात विकास कामे होवू शकतील.करीता आयुक्त साहेबांना विनंती आहे की,सभापती स्थायी समिती,संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांचेशी विचार विनिमय करुन व्यवसाय परवान्याचे व नुतनीकरणाचे शुल्क निश्चित करावे. यासाठी अंदाजपत्रकात वेगळे शिर्षक करुन याकरीता स्वतंत्र अकॉवून्ट उघडण्यात यावे. शहरात मोठया प्रमाणात रिक्षा चालतात त्यांनाही शुल्क आकारुन बॅच देण्यात यावी.यामूळे ही महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढु शकते. आयुक्त साहेबांनी चांगले अंदाजपत्रक सादर केलेले असून आयुक्त साहेबांनी ज्यातरतूदी केलेल्या आहेत त्याप्रमाणे निधी खर्च होईल अशी आम्ही आशा करतो. चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात भूमिगत गटार लाईन टाकण्यासाठी फक्त २५ लक्षाची तरतूद करण्यात आलेली आहे ती कमी आहे त्यामूळे भूमिगतगटार लाईनसाठी तरतूद वाढवून देण्यात यावी. शासनाकडून जलकुंभ बांधण्यासाठी ७५ लक्षाचा निधी मिळालेला असून शासन निर्णयानुसार यामध्ये महानगरपालिकेचा १० टक्के सहभाग भरावा लागणार असल्याने १० टक्केचा सहभाग नोंदविण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी.

**संजय मोरे** शहरात मोठया प्रमाणात रिक्षा चालतात ,फोर व्हीलर,टू व्हिलर चालतात यामूळे शहरातील रस्ते वारंवार दुरुस्त करावे लागते यासाठी मोठयाप्रमाणात महानगरपालिकेस खर्च करावा लागतो त्यामूळे शहरातील सर्व वाहनाना महानगरपालिकेने विशेष कर लावावा यामूळे महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढू शकते.

**आयुक्त** शासनाच्या दोन विभागामार्फत रिक्षावर नियंत्रण ठेवण्यात येते. आरटिओ मार्फत रिक्षाना परवाना देण्यात येतो व शहरातील वाहतुक नियंत्रक पोलिस दल, आपण रिक्षाकरीता जे थांबे देता त्या थांब्यावर उभे राहण्यासाठी काही शुल्क आकारता येते काय याबाबत महानगरपालिका अधिनियमातील तरतदी तपासून शुल्क आकारण्याबाबत निर्णय घेता येइल.शहरात ८० टक्के रिक्षा या शहराबाहेरील परवाना असलेल्या रिक्षा चालतात,महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनूसार शहरातील ऑटोधारकांना बॅच देता येतो काय हे पहावे लागेल. शासनाकडून लोकसंख्याच्या प्रमाणात विविध वित्त आयोगामार्फत महानगरपालिकेस रस्ता अनुदान,रस्ता दुरुस्ती अनुदान महानगरपालिकेस मिळते.हे अनुदान लोकसंख्याच्या प्रमाणात न देता आरटिओकडून नांदेड शहराच्या हध्दीतील पत्यावर जेवढया वाहनांची नोंद होते त्या वाहनाच्या संख्याच्या प्रमाणात अनुदान देण्याची मागणी शासनास करावी लागेल. शासनाने स्थानिक संस्था कर बंद केल्यामूळे महानगरपालिकेस मालमत्ताकरा शिवाय दुसरे साधन म्हणून उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवून वाहनाच्या संख्येनूसार अनुदान देण्यासाठी शासनास विनंती करण्यात येईल. शहरात ब-याचश्या व्यवसायीकांनी व्यवसाय परवाना काढलेला नसल्याचे दिसून आलेले आहे. १ एप्रिल नंतर सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी आपल्या क्षेत्रातील सर्व ठोक ,किरकोळ, चहा व पान स्टॉल व्यवसायीकांचा सर्व्हे करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमयातील तरतूदीनूसार ज्या व्यवसायीकांनी व्यवसाय परवाना काढलेला नाही त्यांना नोटीसा देण्यात येतील व निश्चित करण्यात आलेले शुल्क आकारुन त्यांना व्यवसाय परवाना देण्याची कार्यवाही क्षेत्रिय अधिका-या मार्फत करण्यात येइल.ज्याचे व्यवसाय परवान्याची मुदत संपलेली आहे त्यांना नुतनीकरणासाठी नोटीसा देवून त्याचे व्यवसाय प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यात येईल.

**विनय गुर्रम** शहरात ९० टक्के घरात टिव्हीला कॅबल कनेक्शन देण्यात आलेले असून हे केबल महानगरपालिच्या व एमएसईबीच्या पोलवरुन घेण्यात आलेले आहे. परतु शासनाकडून टिव्ही कॅबल धारकाकडून करमणूक कर वसुल करण्यात येतो. महानगरपालिकेस त्यापासून काहीही उत्पन्न मिळत नाही,जसे शासनाचा अकृषिक कर महानगरपालिका वसुल करते, यापासून महागरपालिकेस काही उत्पन्न मिळते किंवा नाही.

**उपआयुक्त** महानगरपालिकेने वसुल केलेल्या अकृषिक कराच्या ५ टक्के रक्कम महानगरपालिकेस निधी देण्यात येतो.

**विनय गुर्रम** एमएसईबी महानगरपालिकेच्या जागेवर विद्युत पोल,डिपी, बसविते त्याजागेचे भू भाडे एमएसईबीकडून धेण्यात यावे. महागनरपालिका त्यांना मिटर रिडींग प्रमाणे विद्युत देयके देते त्याच प्रमाणे महानगरपालिकेनेही पोलच्या डिपीच्या जागेचे मुल्यांकनानूसार भूभाडे आकारावे यामूळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होवू शकेल.

**आयुक्त** करमणुक ॲक्ट शासनाचा असुन मुंबई शहरात प्रती सेटअप ४० रुपये व इतर शहरासाठी ३० याप्रमाणे जिल्हाधिका-या मार्फत करमणूक कर वसुल करण्यात येतो, करमणूक कर ॲक्टनुसार कॅबलधारकांना परवानगी देण्याचे अधिकार व त्यावर नियत्रण ठेवण्याचे पुर्ण अधिकार जिल्हाधिका-यांना आहेत यामध्ये महानगरपालिकेचा कोणताही रोल नाही. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीसाठी कॅबल धारकांना शुल्क आकारता येईल काय शोधले परंतु अधिनियमात अशी कोणतीही तरतूद दिसून आलेली नाही. तसेच महानगरपालिकेस ज्या बाबीसाठी उपविधी, नियम विनियम करण्याचे अधिकार आहेत त्या बाबीमध्ये करमणूक कराची बाब नाही.एमएसईबी महानगरपालिकेच्या जागेवर विद्युत पोल व डिपी उभे करीत असल्यामूळे त्याजागेचे भू भाडे देण्यासाठी वारंवार एमएसइबीला कळविण्यात येते परंतु ते देत नाही, ही बाब वेगळी हा प्रश्न केवळ नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पुरताच नसुन राज्यातील पुर्ण महानगरपालिका व नगरपालिकेचा आहे. राज्य शासनाकडे महानगरपालिकेच्या विविध समस्या व मागण्याची पुर्तता करण्यासाठी राज्यात महापौर परिषद अस्तित्वात असून आपल्या महानगरपालिकेचे महापौरही या परिषदेत आहेत त्यांनी महापौर परिषद हा प्रश्न मांडून शासनाकडे पाठपुरावा करावा.

**उमेशसिंह चव्हाण** शहरातील खाजगी दवाखान्याच्या इमारतींना कोणत्याही दराने मालमत्ता कराने मालमत्ता कर आकारण्यात येतो.

**आयुक्त** खाजगी दवाखान्याच्या इमारतींना कमर्शीयल दराने मालमत्ता कर आकरण्यात येतो तसेच सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानुसार नर्सिग ॲक्ट प्रमाणे खाटाच्या संख्यानुसार नोंदणी शुल्क आकारण्यात येते.

**उमेशसिंह चव्हाण** सभापती मॅडमना विनंती आहे की. नगरसेवकांचे शिफारशीनूसार त्याचे प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी नगरसेवक स्वेच्छा म्हणून प्रत्येकी रु. ३०-०० लक्षाची तरतूद करण्यात यावी. व ठेवण्यात आलेल्या तरतूदी प्रमाणे ३०-३० लक्षाची कामे करण्यात यावी, यामध्ये १२.०० लक्ष, १०.०० असे करण्यात येवू नये.

**आयुक्त** नगरसेवकांच्या शिफारशीनूसार काम करीत असतांना काही वेळेस अंदाजपत्रकात वाढ होते तर काही कामासाठी अंदाजपत्रक दरापेक्षा जास्त दराच्या निविदा मंजुर कराव्या लागतात त्यामूळे मंजूर स्वेच्छा निधी पेक्षा जास्तीचा खर्च होतो.

**उमेश चव्हाण** आयुक्तास अंदाजपत्रकाच्या १० टके जास्तीचे रक्कमेस मान्यता देण्याचे अधिकार आहे, २०-३० टक्केपेक्षा अधिक वाढ होत असेल तर अशा बाबतीत निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्त व सभापती स्थायी समिती यांना देण्यात यावे.

**शेख फारुख हुसेन** कंत्राटदाराचे कामाचे देयक न दिल्यामूळे कंत्राटदार आमच्या प्रभागात कामे करण्यास तयार नाही. त्यासाठी आपण काय करणार आहात.

**आयुक्त** महानगरपालिकेचे उत्पन्नाचे प्रमूख दोनच साधने आहे, मालमत्ता कर व स्थानिक संस्था कर. या वर्षी राज्य शासनाने स्थानिक संस्था कर बंद केल्यामूळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती बिकट झालेली आहे. मागील वर्षी महानगरपालिकेस ६२ कोटीचे उत्पन्न झाले होते या वर्षी २० टक्के नैसर्गिक वाढ धरुन ८० कोटीचे उत्पन्न अपेक्षीत होते परतु स्थानिक संस्थ कर रध्द केला म्हणून शासनाने एलबीटीच्या नुकसान भरपाई पोटी शासनाने आज पर्यत जवळपास ४० कोटीचा निधी दिलेला आहे. एलबीटी बंद केल्यामूळे महानगरपालिकेचे दरमहा ३-४ कोटीचे नुकसान झाले आहे त्यामूळे कंत्राटदाराचे देयक ,कर्मचा-यांचा पगार वेळेवर देण्यास अडचण येत आहे. २०११ पासून कंत्राटदाराची देयके देणे आहे. जर शासनाने महानगरपालिकेस ६० कोटीचा निधी दिला तर कत्राटदाराची देणे ८० टक्के देणे शक्य होईल व आर्थिक परिस्थिती पुर्ववत होइल. शासनाकडे निधी उपल्बद्द करुन देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. जसा जसा पैसा येईल त्याप्रमाणे कंत्राटदाराची देयके देण्यात येत आहे.

**उमेशसिंह चव्हाण** आयुक्त साहेबांनी आपल्या मनोगतात २२ कोटीचे उत्पन्न अपेक्षीत असून त्यापैकी २.४० कोटीचे महसुल मिळाला असल्याचे सांगितलेले आहे त्यामूळे थकबाकीचे प्रमाण जास्त दिसून येते. आयुक्त साहेबाना विनंती करण्यात येते की थकबाकी वसुल करण्यासाठी ज्या ज्या उपाय योजना करता येतील त्या त्यांनी कराव्या सक्तीने कराची वसुली करावी व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवावे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले तरच आपणास शहरात विकासाची कामे करता येईल. एमएसईबीचे विद्युत बिल थकले तर एमएसईबी विद्युत कनेक्शन कट करते, मोबाईलचे बिल भरले नाही तर मोबाईल कंपन्या मोबाईल बंद करतात,तसेच महानगरपालिकेचा कर भरणे हे नागरीकांचे कर्तव्य आहे. क्षेत्रिय कार्यालयामार्फत पाण्याचे नळ कनेक्शन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. मुख्य कार्यालयातील का.अभियंत्यास कुठे कुठे पाणी पुरवठा कनेक्शन देण्यात आले याची माहिती होत नाही.त्यांना शहरात एकूण किती पाणी पुरवठा कनेक्शन आहेत याची माहिती विचारली तर ते आम्हाला माहिती नसल्याचे सांगतात त्यामूळे नळ कनेक्शन देण्याची कार्यवाही मुख्य कार्यालयातील पाणी पुरवठा विभागा मार्फत नळ कनेक्शन देण्याची कार्यवाही करण्यात यावी अशी आमची मागणी आहे. पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पाण्याची पातळी खाली गेलेली आहे जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी शहरातील प्रत्येक घसरासाठी रेन वॉटर हार्वेस्टीग योजना प्रभावीपणे अमलात आणणे आवश्यक आहे प्रथम महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये रेन वॉटर हार्वेस्टींग योजना राबविण्यात यावी.नागरीकांना बांधकाम परवानगी देतांना रेन वॉटर हार्वेस्टीग करण्याची अट टाकण्यात यावी.

**आयुक्त** बांधकाम परवानगी देतांना आपण रेन वॉटर हार्वेस्टींगची योजना करण्याची अट टाकत आहोत परंतू त्याची प्रत्यक्षात अमलबजावणी करणे हे खुप कठिण आहे. शहरातील सर्व भागात घराचे बांधकाम झालेले आहे जे काही नविन बांधकामासाठी अर्ज सादर करतात त्यांना ही अट टाकण्यात येत आहे. नव्याने जो भाग महानगरपालिका हध्दीत समावेश झालेला आहे जसे दोन्ही तरोडा, वसरणी, कौठा, वाघाळा, असदवन या विस्तारीत भागातील एक एकर पेक्षा जास्त जागेतील ले आवूट मंजुर करतांना कॉमनमध्ये रेन वाटर हार्वेस्टींगची योजना करण्याचे कम्पलसरी केलेले आहे तसेच याच बरोबर शासनाने ज्या नागरीकाचे धराचे बांधकामावर रुपये पाच लाख पेक्षा अधिक खर्च होत आहे अशा घराना किंवा २४० चौरस मिटरपेक्षा अधिकचे बांधकाम होत असेल अशा घराना दोन युनिटचे सोलार उर्जा सेट व त्यासोबत सोलार वॉटर हिटर सोलार उर्जा सेट व त्यासोबत सोलार वॉटर

हिटर २४० फुटापेक्षा जास्तीचे बाधकाम असेल तर ४ युनिटचे सोलार सोलार उर्जा सेट व त्यासोबत सोलार वॉटर हिटर बसविण्याचे कम्पलसरी केलेले आहे त्याप्रमाणे बांधकाम परवानगी देतांना हीही अट टाकण्यात येत आहे.

**सभापती** सन **२०१५-२०१६** चे सुधारीत अंदाजपत्रकात ठरावात दर्शविण्यात आल्याप्रमाणे खर्च बाजूस सुधारणा करुन उर्वरीत अर्थसंकल्प जसेच्या तसे मंजुर करण्यासाठी महासभेस शिफारस करण्यात येते सन स्थायी समिती सदस्यांच्या सुचने प्रमाणे वार्ड विकास निधी अंतर्गत स.सदस्यांच्या शिफारशीनूसार त्यांचे प्रभागात प्रत्येकी ३०-३० लक्षाची कामे करण्यासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात येत आहे. आयुक्तांनी केलेल्या शिफारशीनूसार केंद्रीय विद्यालयाचे धर्तीवर मनपाची इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करणे, विविध बाबीकरीता भुसंपादन करणे ई.बाबीकरीता अंदाजपत्रकात तरतूद करण्यात येत आहे. स. सदस्यांनी मूळ अर्थसंकल्पास ज्याबाबीकरीता तरतूद करण्याची शिफारस केली आहे त्याप्रमाणे सन २०१६-२०१७ चे मूळ अर्थसंकल्पात ठराव क्र.२२६ मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे तरतूदी करण्यासाठी व उर्वरीत आयुक्तांचे अर्थसंकल्पास व त्यातील प्रस्तावास मान्यता देण्यासाठी महासभेस शिफारस करण्यात येते, हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्र.२२६** **ठराव**

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगपालिका नांदेड यांनी स्थायी समिती समोर सादर केलेल्या सालसन **२०१५-२०१६** चे सुधारीत अर्थसंकल्पात खर्च बाजुस खालील प्रमाणे दुरुस्ती करुन उर्वरीत अर्थसंकल्प जसेच्या तसे मंजुर करुन त्यास मान्यता देण्यासाठी हि नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस शिफारस करते. तसेच आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी स्थायी समिती समोर सादर केलेले सालसन **२०१६-२०१७** चे मूळ अर्थसंकल्पात खालील दर्शविण्यात आल्या प्रमाणे विविध शिर्षकात दुरुस्ती व फेरफार सुचवून उर्वरीत अंर्थसंकल्पास तसेच अर्थसंकल्पात आयुक्तांनी केलेल्या प्रस्तावसह जसेच्या तसे मंजुर करण्यासाठी ही स्थायी समितीची सभा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस शिफारस करते.

**सालसन २०१५-१६ चे सुधारीत अंदाजपत्रक - खर्च बाजु**

| अ.क्र. | लेखा शिर्ष | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली तरतुद |
|---|---|---|---|
| १ | भुमिगत गटार देखभाल दुरुस्ती | २५,००,०००/- | १,५०,००,०००/- |
| २ | नविन संगणक खरेदी संगणक साहित्य खरेदी | ५०,००,०००/- | ७०,००,०००/- |
| ३ | केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजने अंतर्गत भरावयाचा मनपा सहभाग | --- | ५०,००,०००/- |
| ४ | परिवहन व्यवस्था (मनपा निधीतुन) | --- | १,००,०००/- |
| ५ | मनपा हद्दीत RUB खालचे पाण्याचा उपसा करणे | ६,००,०००/- | ८,००,०००/- |
| ६ | नविन वाहन खरेदी | २५,००,०००/- | ४५,००,०००/- |
| ७ | साहित्य खरेदी व फ्रेम कव्हर पुरवठा | ५,००,०००/- | २५,००,०००/- |
| ८ | इमारत भाडे | ५,००,०००/- | ६,००,०००/- |
| ९ | नविन भुमिगत गटार देखभाल दुरुस्ती तथा विज शुल्क व इतर | २,००,००,०००/- | ३,००,००,०००/- |
| १० | पाणी पुरवठा प्रारंभीक कामे | ३५,००,०००/- | १,००,००,०००/- |
| ११ | नविन भुमिगत गटार | १५,००,०००/- | १,००,००,०००/- |
| १२ | मागील वर्षातील विविध विभागाती थकीत देयकाची अदाई करणेसाठी (स्पील वर्क) | २३,००,००,०००/- | २०,००,००,०००/- |
| १३ | कर्ज परतफेड पाणी पुरवठा योजना इत्यादी | १,००,००,०००/- | ५०,००,०००/- |
| १४ | जमीनीचा मोबदला | १०,००,००,०००/- | ८,६१,००,०००/- |

**सालसन २०१६-१७ चे मुळ अंर्थसंकल्पचे जमा बाजु**

| अ.क्र. | लेखा शिर्ष | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली तरतुद |
|---|---|---|---|
| १ | परिवहन व्यवस्था सेवेतुन उत्पन्न | -- | १,००,०००/- |
| २ | JUUNRM योजना / अमृत अभियान अंतर्गत विकास | -- | १०,००,०००/- |
| ३ | शासनाचे विशेष अनुदान | १,००,००,०००/- | ७०,००,००,०००/- |
| ४ | सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीनुसार हार्डशिप प्रिमियम तसेच कम्पांडींग फिस | ८,००,००,०००/- | १७,००,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | नाहरकत प्रमाणपत्र, आर्किटेक्ट लायसन्स, छाननी फिस, अनामत रक्कम बांधकाम एलबीटी, पावसाच्या पाण्याचे पुर्नभरण अनामत | ३,००,००,०००/- | ८,००,००,०००/- |
| ६ | मनपा हद्दीत व्यावसायीक प्रतिष्ठांना व्यावसायीक परवाना सक्तीचा करणे व त्याचे नुतणीकरण करणे | --- | १०,००,००,०००/- |
| ७ | **PPP** तत्वावर शहर बस वाहतुक सेवा मार्गांची विक्री करुन महानगरपालिके तर्फे चालविणे | --- | ५४,५०,०००/- |
| ८ | **BOT & BFT** मनपाकेच्या सर्व मंगलकार्यालय / सांस्कृतीक सभागृहाचे खाजगीकरण तत्वावर शॉपिंग कॉम्पलेक्स व मंगलकार्यालय बांधणे. बंजारा हॉस्टेलच्या जागेवर शॉपिंग कॉम्पलेक्स व मंगलकार्यालयाचे बांधकाम करणे, रणजीतसिंघ मार्केट, राजीवगांधी मार्केट, आयुर्वेदिक दवाखान्या जवळील मार्केट व इतर मार्केटचे बांधकाम करणे | ५,००,००,०००/- | ६,१०,००,०००/- |

**सालसन २०१६-१७ चे मुळ अंर्थसंकल्पचे खर्च बाजु**

| अ.क्र. | लेखा शिर्ष | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली तरतुद |
|---|---|---|---|
| १ | गुरुव्दारा लंगर साहेबच्या वतीने नांदेड शहरात होत असलेल्या वृक्षारोपना करिता ट्रीगार्ड खरेदी करणे | ५०,००,०००/- | ७५,००,०००/- |
| २ | लातुर रोड बाबासाहेब आंबेडकर चौकाचे सुशोभिकरण करणे | --- | ५०,००,०००/- |
| ३ | राष्ट्र पुरुषांची पुतळे देखभाल ,नावामनपा मुख्य कार्यालयाचे इमारती समोर नांदेड नगरपालिकेचे पहिले लोकनियुक्त कै.शंकरराव चव्हाण यांचा पुतळा तसेच सावित्रीबाई फुले - महात्मा ज्योतीबा फुले ,छत्रपती शाहू महाराज,महात्मा बसवेश्वर, व हरित क्रांतीचे जनक कै.वसंतराव नाईक यांचे पुतळे उभारणे,तसेच तथागत भगवान गौतम बुध्दांची पुर्णाकृती मुर्ती बसविणे व इतर पुतळे उभारणे (महाराष्ट्र शासनाच्या निधीतून तरतूद न झाल्यास मनपा निधीतून ) | ३,००,००,०००/- | ५,००,००,०००/- |
| ४ | शहरातील मनपा मालकीच्या मोकळया भुखंडावर महसुल वाढीसाठी व्यावसायीक बांधकाम करणे व उर्वरीत जागेत खेळांचे मैदान व उद्यान विकसीत करणे. | --- | २,००,००,०००/- |
| ५ | नांदेड शहरातील स्मशानभुमि / कब्रस्तानचा विकास करणे व भुसंपादन करणे | २५,००,०००/- | ४,००,००,०००/- |
| ६ | सिडको येथील कै. डॉ शंकरराव चव्हाण अभ्यासीका येथे फर्निचर व पुस्तके खरेदी करणे | --- | २५,००,०००/- |
| ७ | मनपाकेच्या क्षेत्रीय कार्यालय अ,ब,क,ड मध्ये भाजीपाला मार्केटचे बांधकाम करणे | --- | ४,००,००,०००/- |
| ८ | मनपाकेच्या क्षेत्रीय कार्यालय अ,ब,क,ड मध्ये मटन मार्केटचे बांधकाम करणे | --- | ४,००,००,०००/- |
| ९ | मनपाकेच्या टंचीन ग्राऊड येथे विकास आराखडयात दर्शविण्यात आल्याप्रमाणे उद्यान विकसीत करणे | ५,००,०००/- | ५०,००,०००/- |
| १० | ट्रक टर्मिनल उभारणे करिता भुसंपादन करणे | १,००,०००/- | १,००,००,०००/- |
| ११ | केंद्रीय विद्यालयाच्या धर्तीवर मनपाकेची इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करणे (भुसंपादन व नविन इमारत बांधकाम करणे) | ५०,००,०००/- | १,००,००,०००/- |
| १२ | साईनगर भागात बाबा शेख फरीद दवाखान्याचा उर्वरीत विकास कामे करणे बाबत | --- | २४,००,०००/- |
| १३ | संत बाबा जोंगेंद्रसिंघ उद्यानाचे सुशोभिकरण करुन कंपाऊडवॉलचे बांधकाम करणे | --- | २४,००,०००/- |
| १४ | शहरातील मुख्य अग्निशमन केंद्राची उभारणी व जुन्या नांदेड शहरासाठी अग्निशमन केंद्र उभारणे | --- | ३,००,००,०००/- |
| १५ | अबचलनगर येथील मलनिस्सारण लाईन टाकणे | --- | २५,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | स. सदस्यांच्या शिफारसीसह भांडवली जमा मधुन प्रत्येक प्रभागात विकास कामे करणे ६०.०० लक्ष प्र.क्रं. ७ करिता ९०.०० लक्ष | --- | २५,८०,००,०००/- |
| १७ | पाणी पुरवठयाची शिल्लक व तातडीची कामे करणे | १५,००,०००/- | ४,००,००,०००/- |
| १८ | शहरातील भुजल पातळी वाढविण्याकरिता जलपुर्नरभरण कार्यक्रम राबविणे | --- | २०,००,०००/- |
| १९ | शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे वियुत व ध्वनीक्षेपक व्यवस्थे करिता | -- | २०,००,०००/- |
| २० | स्टेडीयम येथील व्यायमशाळा, वजीराबाद व किल्ला येथील मातीचे आखाडे विकसीत करणे | --- | २५,००,०००/- |
| २१ | प्र.क्रं. ३६ मध्ये वसरणी अंतर्गत शंकरनगर, रहिमपुर जावाईनगर ई. भागात अंतर्गत रस्ते व नाल्यांचे कामे करणे | --- | ५०,००,०००/- |
| २२ | महापुरुषांच्या जयंती निमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करणे | --- | २५,००,०००/- |
| २३ | मनपाकेच्या RUB खालचे पाण्याचा उपसा करणे | ६,००,०००/- | ७,००,०००/- |
| २४ | ट्राफीक सिग्नल्स ची देखभाल व दुरुस्ती करणे | ५,००,०००/- | १०,००,०००/- |
| २५ | नविन ट्राफिक सिग्नल्स बसविणे | ५,००,०००/- | ५०,००,०००/- |
| २६ | नविन वाहने खरेदी करणे | २५,००,०००/- | ५०,००,०००/- |
| २७ | सभा भत्ता, समित्याच्या बैठकीचा खर्च | ७,००,०००/- | १०,५०,०००/- |
| २८ | मनपा उत्पन्न वाढी व खर्च बचतीकरिताचे मार्गदर्शना करिता वित्तय सल्लागारची नियुक्ती करणे | --- | ३,००,०००/- |
| २९ | सिडको हाडको भागात जलतरणीका उभारणे | --- | १०,००,०००/- |
| ३० | गोकूळनगर येथील इंदिरा गांधी मैदानाचा विकास करणे | --- | २५,००,०००/- |
| ३१ | मागील वर्षातील शिल्लक कामांसाठी (स्पील वर्क) | ५,००,००,०००/- | ३०,००,००,०००/- |
| ३२ | लहान व मध्ये शहराचा विकास IDSMT मनपा माध्यमातुन करावयाचे विकास कामा बाबत | ४,००,००,०००/- | १०,००,००,०००/- |
| ३३ | भुमिगत गटार दुरुस्ती | २५,००,०००/- | २,००,००,०००/- |
| ३४ | साहित्य खरेदी व फ्रेम कव्हर पुरवठा | ५,००,०००/- | २५,००,०००/- |
| ३५ | नविन भुमिगत गटार देखभाल दुरुसती तथा विज शुल्क व इतर | २,००,००,०००/- | ३,००,००,०००/- |
| ३६ | पाणी पुरुव प्रारंभीक कामे | ३५,००,०००/- | १,००,००,०००/- |
| ३७ | नविन भुमिगत गटार | १५,००,०००/- | १,००,००,०००/- |
| ३८ | महाराष्ट्र नागरी दलित्तेत्तर सुवर्ण जयंती अभियान (किल्ला जलकुंभ व रेल्वे स्टेशन जलकुंभ मनपा सहभाग) | --- | ७५,००,०००/- |
| ३९ | केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजने अंतर्गत भरावयाचा मनपाकेचा सहभाग | --- | २,००,००,०००/- |
| ४० | JNNURM योजना / अमृत अभियान अंतर्गत विकास | --- | १०,००,०००/- |
| ४१ | नविन संगणक खरेदी संगणक साहित्य खरेदी | ५०,००,०००/- | ७०,००,०००/- |
| ४२ | परिवहन व्यवस्था (मनपा निधीतुल) | --- | १,००,०००/- |
| ४३ | दुलेहशाह रहेमान इदगाहचे विकास कामे करणे | --- | १,५०,००,०००/- |
| ४४ | खडकपुरा पाण्याच्या टाकी खाली व्यामशाळेच्या साहित्य खरेदी करण | --- | १०,००,०००/- |

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.